# टी वाय. बी. ए. - जी- ३

# ग्रंथपरीक्षण – घटक -१

## ग्रंथपरीक्षकाचे गुण व ग्रंथ परीक्षण कसे करावे

प्रा. तुकाराम भवर

# ग्रंथ परीक्षकाचे गुण :

- १) ग्रंथपरीक्षणात साहित्यकृतीचे मूल्यमापन समाविष्ट असते. लेखकाने जे लिहिले आहे, त्या कलकृतीची सर्वांगीण ओळख सामान्य रसिक वाचकांना करून देण्याची आस्था ग्रंथपरीक्षकांजवळ हवी.

- २) ग्रंथपरीक्षकाला रसिकता, अभ्यासपूर्ण विद्वत्ता, पांडित्य, लेखक – कवीच्या व्यक्तिमत्त्वाचे पूर्ण ज्ञान (ओळख) व संबंधित साहित्यकती रचनेचे - निर्मितीचे संकल्पनांचे योग्य भान पाहिजे. म्हणजेच साहित्यकृतीचे रसग्रहण करण्याची क्षमता असल्याशिवाय गत्यंतर नाही.

# ग्रंथ परीक्षकाचे गुण :

- ३) ग्रंथपरीक्षकाला साहित्यकृतीचे रहस्य उलगडून दाखवण्याची विवेचक बुद्धी, साहित्यव्यवहार वाङ्मयीन संप्रदाय, यांचा परस्परांशी असणारा अनुबंध लक्षात घेऊन कलाकृतीचे मूल्यमापन अपेक्षित आहे.
- ४) ग्रंथपरीक्षकाने आपली मते रसिक वाचकांवर लादू नयेत. वाचकांनाही सहृदयता,अभ्यासू वृती, विचारशक्ती असते, यांविषयी विश्वास बाळगावा त्या दृष्टीने अधिक निर्दोष, सर्वांगपरिपूर्ण ग्रंथपरीक्षण करण्याची क्षमता बाळगण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येते. ग्रंथपरीक्षक बहुश्रुत, चोखंदळ, अभिरुचिसंपन्न असणे आवश्यक आहे.

# ग्रंथ परीक्षकाचे गुण :

- ५ ) ग्रंथपरीक्षक पुराणमत्ताभिमानी, संकुचित तसेच ज्ञान - विज्ञान शाखेत नवे विचार - नवे प्रवाह याबाबतीत मागासलेला नसावा! पूर्वग्रहदूषितपणा, छिद्रान्वेषी दृष्टी नसावी!

- ६ ) कलाकृतीचे अंतरंग उलगडून दाखवताना आवश्यक अशी एकाग्रता, किमान तटस्थवृत्ती बाळगण्यात गैर काहीच नाही.

- ७ ) साहित्य कृतीसह कवी लेखकाच्या पूर्वपरंपरेचे भान, समाज, भाषा, संस्कृती यांच्याशी असणारा ग्रंथकारांचा अनुबंध समजून घेणारा ग्रथपरीक्षक आपले कार्य चोख बजावतो, याकडे लक्ष वेधण्यात येते.

# ग्रंथ परीक्षकाचे गुण :

- ८ ) ग्रंथपरीक्षकाने आपले ज्ञान सतत अद्ययावत व परिपूर्ण ठेवावे. आपली अभिरुची, चिंतन-मनन निर्दोष राहण्याइतपत साहित्यव्यवहारात दक्षता बाळगण्यास रसिक व कवी लेखक यांमध्ये त्यांना मानाचे स्थान राहील!

- ९ ) ग्रंथपरीक्षकाला सर्व शास्त्र-कला याविषयीचे सर्वसाधारण ज्ञान हवेच. देश कालपरिस्थिती, संस्कृती, लोकसाहित्य, लोकसंस्कृती, वाङ्मयीन वाद, वाङ्मयीन परंपरा, याविषयी साधक बाधक माहिती पाहिजे. ग्रंथपरीक्षणात योग्य वेळी तारतम्यतेने, विवेचक समतोल बद्धीने या संकल्पनांचा उपयोग करण्याचे कौशल्य असल्यास ग्रंथपरीक्षण अधिक परिपूर्ण, निर्दोष व वस्तुनिष्ठ होईल!

# ग्रंथपरीक्षण कसे करावे:

१)ग्रंथकाराची ओळख /परिचय :

ग्रंथपरीक्षणासाठी सुरुवातीलाच, ग्रंथकार कोण? कोणत्या संप्रदायाशी संबंधित, त्यांचे व्यक्तिमत्त्व व लेखन विशेष, यांसह त्यांना मिळालेले पुरस्कार, मानसन्मान यांचा थोडक्यात निर्देश करणे योग्य ठरते. उदा. सुप्रसिद्ध ग्रामीण लेखक सदानंद देशमुख यांची साहित्य अकादमीप्राप्त कलाकृती 'बारोमास' किंवा प्रसिद्ध वैज्ञानिक ख्यातनाम विज्ञानलेखक डॉ. जयंत नारळीकर यांचा (विज्ञान) कथासंग्रह 'यक्षाची देणगी' तसेच स्त्रीवादी साहित्याच्या समीक्षक लेखिका (प्राचार्य) डॉ. अश्विनी धोंगडे इ. या शब्दांत विविध ग्रंथकारांची थोडक्यात ओळख करून देण्याची प्रथा आहे. या ओळखीतून त्यांच्याशी संबंधित ग्रंथाचे अंतरंग काय आहे याचाही अंदाज वाचक रसिकांना येतो.

# ग्रंथपरीक्षण कसे करावे:

## २) ग्रंथाचे अंतरंग :

ज्या ग्रंथाचे परीक्षण करावयाचे त्याचा आशय आणि ' विषय यासंबंधी समर्पकतेने विवेचन करावे लागते. जेणे करून रसिक वाचकाला ग्रंथ वाचण्यासंबंधी जिज्ञासा जागृत होईल, याचेशी संबंधित टीका - टिपणी, मते-मतांतरे यांचीही उकल झाली पाहिजे. शिवाय ग्रंथातील विविध प्रकरणे, विभाग, खंड, पूर्वार्ध - उत्तरार्ध यांचीही नोंद परीक्षण विषयाच्या अनुषंगाने घेणे श्रेयस्कर ठरते. ग्रंथविषयाचे वेगळेपणही सांगितले जाते. .

# ग्रंथपरीक्षण कसे करावे:

**३) ग्रंथलेखन शैली / वाङ्मयीन सौंदर्य विशद करणे :**

ग्रंथपरीक्षणात लेखकाचे व्यक्तिमत्त्व पुस्तक लिहिण्यामागची प्रेरणा, भूमिका सांगून आस्वादक्षम वाङ्मयीन सौदर्य, उलगडून दाखविले पाहिजे. ग्रंथातील जमेच्या बाजू लिहिताना, रस, अलंकार, कल्पना सौंदर्य, प्रतिमा, प्रतीक, शब्दसौंदर्य यांचाही उल्लेख करावा लागतो. काही वेळा काव्यपंक्तीही उदधत करून त्याचे ग्रंथातील स्थान व महत्त्व स्पष्ट करून सांगण्यात येतात. सौंदर्यस्थळे देखील दुर्लक्षित करून चालणार नाही.

# ग्रंथपरीक्षण कसे करावे:

## ५) ग्रंथाचे सामर्थ्य व मर्यादा :

ग्रंथपरीक्षणात ही एक महत्त्वाची बाजू असून वाङ्मयीन व्यवहारात या ग्रंथाची दखल का घ्यावी लागली हे नमूद करावे. सद्य:स्थितीत या ग्रंथाचे वेगळेपण, त्याचे प्रकाशन विश्वातील स्थान लिहून ग्रंथाचे प्रस्तावनाकार यांनी लिहिलेल्या विचारांचाही परामर्श घ्यावा. याशिवाय ग्रंथातील दोष, त्रुटी, उणिवा, मर्यादा यांचे सोदाहरण विवेचन करणे अधिक चांगले. याशिवाय ग्रंथाची तांत्रिक बाजू उदा. मुद्रणदोष, कालविसंगती, बाईंडिंग, मुखपृष्ठ ग्रंथातील आकृती, चित्रे व दिलेला तपशील यांचाही यथायोग्य मूल्यमापनाचा मजकूर समाविष्ट करावा लागतो.

# ग्रंथपरीक्षण कसे करावे:

**६) संकीर्ण :**

यामध्ये ग्रंथलेखक व प्रकाशक, आवृत्ती, पृष्ठसंख्या, किंमत, मिळण्याचे ठिकाण नमूद करावे लागते. आणखी एक म्हणजे ग्रंथ परीक्षणाचे सुरुवातीचा मथळा आकर्षक, ग्रंथविषयानुरूप योग्य शब्दांत लक्षवेधी सुटसुटीत असावा! त्या वाक्यातच ग्रंथपरीक्षणाचा मध्यवर्ती आशय समाविष्ट असतो!